# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women with food material**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **04/05/2020**

**Brief of the work done :-**

## गरिब महिलेची मदतीसाठी पोलीस स्टेशनला धाव !

### पोलिसांनीही दिले जीवनावश्यक साहित्य

**मंगरुळपीर** ■ तालुका प्रतिनिधी



स्थानिक अशोक नगर येथील लोहार व्यवसाय असणाऱ्या महिलेने मदतीसाठी पोलीस स्टेशन गाठले व घरची परिस्थिती सांगितली असता पोलीस अधिकारी व नगरसेवक यांनी सदर महिलेस दीड हजार रुपयांची मदत केली.

सध्या लॉकडाऊनमुळे अनेक कुटुंब आर्थिक अडचणीत सापडली आहेत. सर्व व्यवहार ठप्प असल्याने किरकोळ व्यवसाय, मोलमजुरी करणाऱ्या घटकांना याचा मोठा फटका बसत आहे. स्थानिक अशोक नगर येथील लोहार व्यवसाय असणाऱ्या कुटुंबातील मंगला शाम पवार ही महिला २ मे रोजी रखरखत्या उन्हात पोलीस ठाण्यात आली व ठाणेदार धनंजय जगदाळे यांना , माझा पती लोहार काम करतो तसेच त्याची तब्येत सुद्धा ठीक नसून, व्यवसाय सुद्धा बंद आहे. मला तीन मुली व दोन मुले असून, मोठा मुलगा अकरा वर्षाचा आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी तो गावात भाजी पाला विकतो; परंतु त्याला कोरोनाची लागण होऊ नये म्हणून मला खूप भीती वाटते. आम्हाला काही मदत करा, अस सांगत महिलेने कुटुंबाची व्यथा मांडली. यावेळी ठाणेदार धनंजय जगदाळे, पीएसआय मंजुषा मोरे व नगरसेवक अनस अहमद यांनी सदर महिलेस जीवनावश्यक वस्तू देऊन दीड हजार रुपयांची मदत केली. यामुळे पोलिसांत असलेल्या माणुसकीचा पुन्हा एकदा प्रत्यय आला.

ePaper देशोन्नती
Mon, 04 May 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/51583776